महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९७ वा | दिनांक : २५/०९/२०२५ | वार : गुरूवार

# राज्यातील पूरग्रस्त बाधित कुटुंबाला १० किलो गहू-तांदूळ



**मुंबई :** महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळी भाग समजला जाणारा मराठवाडा देखील पुराच्या विळख्यात अडकला आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उघड्यावर पडले आहेत. तसेच शेतांमध्ये पुराचे पाणी गेल्याने पिकांची नासाडी झाली असून शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. अशात आता सरकारने पुढाकार घेतला असून नुकसानग्रस्त भागांची पाहणी सुरू करण्यात आली आहे. तसेच पूरग्रस्त बाधित प्रत्येक कुटुंबाला १० किलो गहू-तांदूळ देण्यात येत आहे.

अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या विभागाकडून बाधित कुटुंबाला धान्य वितरित करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. राज्यातील पूरग्रस्त बाधित प्रत्येक कुटुंबाला १० किलो गहू-तांदूळ वितरण करण्यास सुरुवात झाली असून आत्तापर्यंत २६५४ कुटुंबांना मदत केली आहे. साडे सव्वीस मेट्रिक टन गहू तांदूळ दिला आहे, आमच्या विभागाकडून अन्नधान्य पुरवठा केला जातो आहे, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली आहे. तसेच केंद्राची मदत शंभर टक्के येईल. संकट एवढे मोठे आहे की मदतीची वाट न बघता बाधित लोकांना मदत करायला सरकार पुढे येईल. पंचनामा झाल्यानंतर किती मदत द्यावी हे स्पष्ट होईल, असेही भुजबळ म्हणाले.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, पहिल्या टप्प्यात मदत केली आहे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. असा पाऊस यापूर्वी आम्ही बघितला नाही, असे अनेक लोक म्हणत आहेत. ढगफुटी अनेक ठिकाणी होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम दिसून येत आहेत. पाऊस पडत नाही तर कोसळतोय. त्यामुळे टाऊन प्लॅनिंग करताना विचार व्हायला हवा, असे भुजबळ म्हणाले.

सरकारकडून बाधित कुटुंबांना मदत तर मिळणार आहेच, पण त्याचसोबत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या आमदार, खासदार व मंत्र्यांकडून मदत केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या आदेशानुसार पक्षातील सर्व मंत्री, खासदार, आमदार आणि विधान परिषदेचे आमदार आपला एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करणार असल्याची माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील महापुराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, अजित पवारांनी आज पूर्वनियोजित सर्व कार्यक्रम रद्द करत पूरग्रस्त भागात भेट दिली. सोलापूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांना त्यांनी भेट दिली व पूरपरिस्थितीची पाहणी केली. या भागातील पीडित नागरिकांशी त्यांनी संवाद साधला व सर्व राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना आणि आमदारांना आपापल्या भागात मदतीचे काम सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# शिंदेंची शिवसेना जरांगेंना रसद पुरवत आहे का? : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधू एकत्र येणार की नाही, यावर चर्चांना उधाण आले असताना फडणवीस यांनी यावर भाष्य करताच चर्चांना नवा आयाम मिळाला आहे.

माझ्यावर पक्ष फोडल्याचे आरोप केले जातात. पण जर कोणी म्हटले की, मी ठाकरे बंधूंना एकत्र केले, तर त्याचे श्रेय घेण्यास मला आनंदच वाटेल. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य एकत्रीकरणाबद्दल मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका मांडली.

एकनाथ शिंदेसोबत गैरसमज नसून त्यांचे नाते दृढ असल्याचे देखील देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. ठाण्यातील मुसळधार पावसामुळेच शिंदे एका मंत्रिमंडळ बैठकीला अनुपस्थित राहिले होते, हेही त्यांनी नमूद केले.

त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पसरलेल्या गैरसमजांना त्यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. 'एबीपी' वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी सर्व प्रश्नांची अतिशय दिलखुलासपणे उत्तरे दिली.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर फडणवीसांनी सरकारची ठाम भूमिका मांडली. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देणे ही आमची ठाम भूमिका आहे, असे ते म्हणाले. अलीकडेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोस्टरवरून निर्माण झालेल्या वादाबाबतही त्यांनी भाष्य केले.

शिवाजी महाराज केवळ मराठ्यांचेच नव्हते, तर ओबीसींसह सर्व समाजाचे होते. या पोस्टरचा उद्देश जातीयवाद पसरवणे नव्हता, तर शिवाजी महाराजांच्या समावेशकतेचा संदेश देणे हा होता, असे फडणवीस म्हणाले. त्यांनी स्पष्ट केले की, या पोस्टरमुळे केवळ जातीयवादी मानसिकता असलेल्या लोकांना डिवचले गेले आहे.

त्यामुळे ओबीसी समुदायाला आरक्षणाच्या प्रश्नावर हानी पोहोचणार नाही, तसेच मराठा समाजालाही न्याय मिळेल, यावर सरकार ठाम आहे, हे त्यांनी पुन्हा अधोरेखित केले.

# दांडिया खेळणे म्हणजे हांडगेपणा : संभाजी भिडे

**सांगली :** शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे सर्वेसर्वा संभाजी भिडे यांनी नवरात्रीत खेळल्या जाणाऱ्या दांडियाविषयी एक वादग्रस्त विधान केले आहे. दांडिया खेळणे म्हणजे हांडगेपणा असल्याचे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी भारत हा निर्लज्ज लोकांचा देश असल्याचे नमूद करत भारतीय संविधानावरही निशाणा साधला.

सांगतील शिवप्रतिष्ठानच्या वतीने दुर्गामाता दौड आयोजित करण्यात आली होती. यावेळी धारकऱ्यांना मार्गदर्शन करताना संभाजी भिडे यांनी वरील वादग्रस्त विधान केले. ते म्हणाले, आम्हाला फक्त स्वराज्य किंवा स्वातंत्र्य नको आहे. आम्हाला हिंदवी स्वातंत्र्य हवे आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपले आदर्श आहेत. त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षी विस्कटलेली नवरात्र दुरुस्त करण्याची शपथ घेतली. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून आपण नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दुर्गामाता दौडीचे आयोजन करतो. शिवाजी महाराजांनी ज्या दिवशी शपथ घेतली तो दिवस विस्कटलेल्या नवरात्राला दुरुस्त करण्याचा आरंभ होता.

पण आपण गणपती उत्सव व नवरात्रीत दांडिया खेळून त्याचे वाटोळे केले. दांडिया खेळणे म्हणजे हांडगेपणा आहे, असे संभाजी भिडे म्हणाले.

यावेळी त्यांनी भारतीय संविधानाविषयीही पुन्हा एकदा अवमानास्पद विधान केले. आपली लायकी त्या संविधानात, आणि पोटात मुरड आल्याप्रमाणे विद्वान लोक बोलतात संविधान. कसलं संविधान बोलता? असे ते संतप्त सूरात म्हणाले. भारत हा १३०० वर्षे मुस्लिम व युरोपियनांच्या पारतंत्र्यात खितपत पडलेल्या लोकांचा देश आहे. ज्यांना लाज वाटत नाही, ज्यांना पारतंत्र्याची, गुलामीची लाज वाटत नाही त्या लोकांचा हा निर्लज्ज देश आहे, असेही भिडे यावेळी बोलताना म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे संभाजी भिडे यांनी वादग्रस्त विधान करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. त्यांनी यापूर्वीही अनेकदा अशी वादग्रस्त विधाने केली आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी सर्वधर्म समभाव हा ना धड स्त्री ना धड पुरुष असल्याचे विधान केले होते. सर्वधर्म समभाव हा ना धड स्त्री ना धड पुरुष असा प्रकार आहे. म्हणजे निव्वळ नपुंसकपणा. मी पती तू पत्नी हे उलट पाहिजे, पण ते शक्य आहे का? तर नाही. म्हणून सर्वधर्म समभाव हा निचपणा आहे, असे ते म्हणाले.

खग्रास ग्रहणाच्या काळात मंत्रजाप केल्याने शक्ती मिळते

संभाजी भिडे म्हणाले होते, खग्रास ग्रहणाच्या काळात मनुष्याने एखाद्या मंत्राचा जप केला तर त्याला त्या मंत्राची शक्ती मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांनी गायत्री मंत्राचा जप केला होता. ते काही तास मानेपर्यंत थमंड पाण्यात बसून होते. ३ एप्रिल रोजी त्यांना ताप असह्य झाला. त्यांना तोंडावाटे पाणी दिलेले पाणी शरीराबाहेर पडत होते. शरीर पूर्णपणे खचले होते. तेव्हा ते आपल्या जवळ असणाऱ्यांना म्हणाले होते, आम्ही जातो, आमचा काळ झाला. सप्तसिंधू सप्त गंगा मुक्त करा. हे त्यांचे अखेरचे शब्द होते.

सोयराबाई यांना जे हवे होते ते शक्य नव्हते. छत्रपती संभाजी महाराज राजे व्हावेत असे त्यांना वाटत नव्हते. राजाराम महाराज हे संभाजी महाराज यांच्यानंतर राजे झालेच. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्यात साम्य काय, तर संभाजी महाराज हे शिवाजी महाराज यांच्या तोडीस तोड व्यक्तीमत्व होते. पण संभाजी महाराजांच्या पत्नीचा भाऊ गणोजी शिर्के हा नालायक माणूस निघाला. त्याने वतनासाठी शेण खाल्ले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ सप्टेंबर २०२५



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २६ आणि २७ सप्टेंबर रोजी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमालेचे आयोजन



**उमरगा (प्रतिनिधी) :** उमरगा तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळखंडात स्थापना झालेल्या भारत शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कर्मयोगी श्रीधररावजी मोरे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २६ आणि २७ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाकडून गेल्या २३ वर्षांपासून दरवर्षी या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. विविध सामाजिक विषयांच्या संदर्भात नवयुवकांमध्ये जाणिवा आणि जागृती घडविण्यासाठी विचारमंथन घडवून आणणे हा या व्याख्यानमालेचा उद्देश आहे.

निजाम राजवटीत १९४१ साली भारत शिक्षण संस्थेची स्थापना या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी उदात हेतूने केली होती. शिक्षण हीच प्रगतीची पहिली पायरी ओळखून भारत शिक्षण संस्थेने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या माध्यमातून या भागात उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

या संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या विकासात कर्मयोगी श्रीधरराव मोरे यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यामुुळे त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ २६ आणि २७ सप्टेंबर रोजी दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २६ सप्टेंबर रोजी कोल्हापूर येथील मा. युवराज पाटील यांचे 'उद्याच्या उज्वल भविष्यासाठी' या विषयावर पहिले व्याख्यान पुष्प आयोजित केले आहे.

२७ सप्टेंबर रोजी वारणानगर येथील प्रा. डॉ. प्रीती शिंदे पाटील यांचे 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या विषयावर दुसरे व्याख्यान आयोजित केले आहे.या दोन दिवसीय व्याख्यानमालेस शिक्षणप्रेमी बांधव, विद्यार्थी आणि नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि संयोजन समितीने केले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील कनिष्ठ महाविद्यालयात बुधवारी (ता. २४) रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गोविंद इंगोले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. किसन माने म्हणाले की, स्वयंसेवकांनी स्वतःसाठी नाही तर समाजासाठी परिसर स्वच्छता, प्रौढ शिक्षणासाठी जनजागृती, मतदान जनजागृती, वृक्षारोपण अशा विविध उपक्रमामध्ये स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला पाहिजे. प्राचार्य इंगोले म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्य करण्यास प्रोत्साहित करणे, हे राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्टे असल्याचे व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी गजानन उपासे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रसाद इंगोले, सुजित चिकुंद्रे उपस्थित होते, सूत्रसंचालन व आभार प्रा. शेषराव राठोड यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## बंजारा धनगर व इतर कोणत्याही समाजाला अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गामध्ये समाविष्ट न करण्याचे तहसीलदारांना दिले निवेदन



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** अनुसूचित जमातीच्या यादीत बंजारा,धनगर व इतर कोणत्याही समाजाचा समावेश करू नये. यासंदर्भात मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आदिवासी विकास मंत्री यांना तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन पाठविण्यात आले हैदराबाद गॅझेट नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत २ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यशासनाने निर्णय निर्गमित केला आहे याच गॅजेटचा आधार घेऊन राज्यातील बंजारा धनगर समाज आता अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याची मागणी करू लागला आहे ही मागणी चुकीची असून असंवैधानिक आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रासंबंधात दिनांक ६ सप्टेंबर १९५० रोजीच्या राष्ट्रपतींच्या पहिल्या आदेशात आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संसदेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सूचीबद्ध केलेल्या आहेत त्यामध्ये बंजारा अशी नोंद नाहीत मराठवाड्यातील बहुतांश आमदार व खासदारांनी १९२० च्या हैदराबाद गॅझेटचा आधार एकसारख्याच मजकुरात मुख्यमंत्र्यांच्या नावे पत्रव्यवहार करून मराठवाड्यातील बंजारा (लमाण) धनगर समाजाला हैदराबाद स्टेट गॅझेटियर नुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याबाबत शिफारस केली आहे.

ही पत्रे समाज माध्यमांवर प्रसारीत झाली आहे. तरी अशा आमदार व खासदारांवर लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कारवाई करावी त्याचबरोबर बंजारा धनगर व इतर समाजाला एसटी प्रवर्गात समावेश करू नये अशी मागणी गौताळा अधिवेश ठाकर समाज बहुउद्देशी सेवाभावी संस्था व सह्याद्री आदिवासी म ठाकूर-ठाकूर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सरिचंद दोरे,पांडू कडाळे, गंगाराम आगिवले,खेमा धर्म मधे,कचरू बुधा सावंत,सविता गंगाराम मेंगाळ बाळू मधे संजय मधे रामभाऊ पारधे गणपत पारधे वाळूबा मेंगाळ सोमीनाथ मेंगाळ वाळूबा मधे विजय डोके गंगाराम मेंगाळ पांडुरंग मधे रंगनाथ मधे सुखराम मधे सुरेश डोके अशोक माळे सीताबाई डोके कडूबा गांगड बबन कातवरे रामभाऊ मेंगाळ तुकाराम भांघारे गुलाब भांघारे भाऊसाहेब पथवे प्रल्हाद मेंगाळ सुनील आवाले आदी आदिवासी ठाकर व भिल्ल समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहून तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी खुलताबाद यांना निवेदन देण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ सप्टेंबर २०२५


## राजीव गांधी महाविद्यालयात स्वच्छता अभियान व रक्तगट तपासणी शिबीर




**करमाड** : राजीव गांधी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन व स्वच्छता सेवा अभियान 2025 या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांचे रक्त तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.सोबतच स्वच्छता अभियान*अंतर्गत महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सहभागातून *स्वच्छता अभियान राबविण्यात आले तसेच शासकीय रुग्णालय करमाड यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी शिबीर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे उदघाट्न कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांनी केले. ते उदघाट्न समारंभात बोलताना विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत अशा उपक्रमांतून समाजात सकारात्मक बदल घडतो आणि विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होते असे प्रतिपादन केले.प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला रक्तगट तपासणी करून घ्यावा.जेणेकरून आपला रक्तगट आपणास माहित असणे अत्यंत गरजेचे आहे.

आकस्मिक परिस्थितीत योग्य वेळेला योग्य रक्त मिळण्यासाठी ही माहिती उपयोगी पडते. तसेच यामुळे रक्तदानास प्रोत्साहन मिळून समाजात एखाद्याचा जीव वाचविण्याचे पवित्र कार्य घडते" असे आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रतिपादन केले. स्वछता अभियान अंतर्गत विदयार्थ्यांचे विविध गट तयार करून महाविद्यालय परिसर स्वच्छ करून घेण्यात आला.या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फड व डॉ. नितीन मुळे यांच्यासह डॉ. काळे, डॉ.नरेश डहाळे, डॉ. बाळासाहेब लिहिणार डॉ. चव्हाण, डॉ. राऊत, डॉ. धोंडगे, डॉ. मोरे, डॉ. पठाण, खरात सर, घोडके सर, लावंड सर, माठे सर, होळकर सर तसेच रोहिणी जोशी, अलका कुलकर्णी मॅडम, श्री. वैद्य आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून राबविलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्वच्छतेची जाणीव आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारा ठरला.

## शरणापुर येथील रेल्वे अंडर पास रस्ता २५ ऑक्टोबर पर्यंत खुला करणार रेल्वे चे ठेकेदार यांचे आश्वासन






**दौलताबाद (जावेद अहेमद)** : शरणापुर येथील रेल्वे अंडर पास रस्ता २५ ऑक्टोबर पर्यंत खुला करणार रेल्वे चे ठेकेदार यांचे आश्वासनशरणापुर सहाजापूर रस्त्यावर शरणापुर गावाजवळ रेल्वे गेट नंबर 47 वरील अंडरपास रेल्वे पूलाचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरु असून सध्या या पुलाखाली आठ ते दहा फूट पाणी साचलेले आहे.

हे पाणी लवकरात लवकर काढून रस्ता सुरु करावे या मागणीसाठी दिनांक २५ सप्टेंबर रोजी शरणापुर, वंजारवाडी,करोडी येथील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य व नागरिक छत्रपती संभाजीनगर नाशिक महामार्गा शरणापूर येथे रस्ता रोको आंदोलन करणार होते याबाबत चे निवेदन त्यांनी रेल्वे प्रशासन नांदेड विभाग, विभागीय आयुक्त जिल्हा अधिकारी, पोलीस आयुक्त, दौलताबाद पोलीस स्टेशन ला दिले होत, ही बाब लक्षात घेत दौलताबाद पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांनी दि २४ बुधवारी वजारवाडी चे सरपंच रामेश्वर बोडारे, शरणापूर सरपंच संध्या संदीप सदावर्ते यांच्या सोबत गावातील नागरिक व रेल्वे कॉन्ट्रॅक्टर पंकज कुमार यांची दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये बैठक घेऊन चर्चा घडवून आणली यात पंकज कुमार यांनी एक महिन्याच्या आत सदर पुलाखाली पाणी पाईप द्वारे काढून सदर रस्ता सर्वासाठी २५ ऑक्टोबर पर्यंत खुले करून देण्याचे करण्याचे आश्वासन दिले यामुळे दिनांक 25 सप्टेंबर रोजी होणारे रस्ता रोको आंदोलन तहकुब करण्यात आले.

शरणापुर सहाजापूर रस्त्यावर शरणापुर गावाजवळ गेट नंबर 47 असून येथे अंडरपास रेल्वे पुलाचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू असून हे काम संथ गतीने चालू आहे यामुळे शरनापूर,वंजारवाडी, करोडी येथील नागरिक,विद्यार्थी,दुग्ध व्यावसायिक,भाजीपाला घेऊन जाणारे शेतकरी यांना गेल्या दोन वर्षापासून पर्यायी रस्ता शरणापुर गावाजवळ असलेल्या रेल्वेचे लोखंडी पुलाखालून येथून प्रवास करावा लागत आहे हे रस्ते खराब असल्यामुळे मोठी कसरत करून प्रवास करावे लागत आहे या रस्त्यावर तीन फूट पाण्यातून व खडयातून प्रवास करावा लागतो.शालेय विध्यार्थीना, कंपनी कामगार यांना रात्री अपरात्री जर कोण्ही आजारी पडले वं गरोदर महिला यांना उपचारासाठी दवाखान्यात नेण्यासाठी फारच अवघड रस्त्यावरून जीवघेणा प्रवास करावे लागते हे फारच दुर्देव आहे अशी खन्त वंजारवाडी सरपंच रामेश्वर बोडारे,शरणापूर सरपंच संध्या संदीप सदावर्ते यांनी व्यक्त केली आहे

## जेइएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा









**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे)** : जेईएस महाविद्यालय जालना,येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात रॅली काढून राष्ट्रीय सेवा योजना जिंदाबादच्या घोषणा देण्यात आल्यात. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील परिसर स्वच्छ केला. गाजर गवत उपटून तसेच परिसरातील पाला ~पाचोळा उचलून झाडूने परिसर स्वच्छ केला.यावेळी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये स्वच्छता अमलात आणावी. स्वतःची व परिसराची स्वच्छता करावी.

स्वच्छतेमुळे मानवी जीवन निरोगी असते असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले ,राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना स्वावलंबी जीवन कसे जगावे, हे शिकवते, नॉट मी बट यु, माझ्यासाठी नव्हे, माझे जीवन समाजासाठी आहे, ही राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना विद्यार्थ्यांना डॉ. सोनवणे यांनी समजून सांगितली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगून श्रमसंस्कार जीवनात महत्त्वाचे असल्याचे सांगितले. माजी कार्यक्रम अधिकारी डॉ.गणेश रोकडे यांनीही विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्त्व पटवून सांगितले.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने श्रमदानासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश लहामाटे यांनी तर उपस्थित आमचे आभार प्रा. किशोर तापडिया यांनी व्यक्त केलेत.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, उपप्राचार्य डॉ. सदावर्ते,पर्यवेक्षक डॉ. बिक्कड, तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ सप्टेंबर २०२५







# तुळजापूर येथून आणलेल्या ज्योती चे मक्रणपुर येथे महिलांकडून भव्य स्वागत



**कन्नड (राहूल थेटे) :** तालुक्यातील मक्रणपुर गावात नवरात्रोत्सव निमित्त एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला ३५० (किलोमीटर पायी चालून युवकांचा कौतुकास्पद उपक्रम) नवदुर्गा शारदा मित्र मंडळाच्या वतीने गावातील तरुणांनी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिरातून पायी चालत ज्योत आणण्याचा संकल्प केला आणि तब्बल ३५० किलोमीटर अंतर पायी चालून ही ज्योत गावात आणली.

हि ज्योत रविवारी मक्रणपुर येथे पोहोचली गावात आगमन होताच ग्रामस्थांच्या उत्साह ला उधाण आले विशेष म्हणजे गावातील महिलांनी पुढाकार घेऊन या ज्योतीचे पारंपारिक पद्धतीने ढोल ताशाच्या गजरात आणि फटाक्याच्या रोषणाईत भव्य स्वागत केले या स्वागत सोहळ्यासाठी गावात जणू उत्सवाचेच स्वरूप आले होते.

ज्योत घेऊन येणाऱ्या युवकांचा सन्मान करण्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली हा उपक्रम ग्रामस्थांच्या धार्मिक भावना श्रद्धा व एकोपा यांचे प्रतीक ठरला या भव्य स्वागता वेळी भाजपा चे नेते उद्योजक मनोज पवार संरपच विनायक सोनवणे अमोल सोनवणे अभय ठोंबरे अशोक जाधव महेश रामलाल पवार ओंलाडे विलास जाधव दिपक जगताप संतोष वणे आकाश सोनवणे सचिन सोनवणे राजू जाधव विशाल पवार आकाश पवार अमोल जाधव सुरज पवार सुषमा गायकवाड प्रशांत गायकवाड प्रथमेश पवार चैतन्य पवार किशोर शेजवळ सतीश गायकवाड सुरेश कणसे आदींसह गावातील महिला युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावातील या आगळ्यावेगळ्या धार्मिक उपक्रमामुळे सर्वत्र कौतुकाची लाट उसळली आहे तरुणांच्या या धाडसी व श्रद्धापूर्ण उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात नवरात्रोत्सवाची भक्तिमय रंगत चढली आहे

# १३४ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आदर्शांनी कमविले आणि वारसदारांनी गमविले असे होऊ नये, म्हणून "दूरदृष्टी आणि काटकसर हे वैभव भावी पिढीने टिकविले पाहिजे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा २१ सप्टेंबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, या आठवड्यात बौद्धाचार्याचे जनक भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर व राष्ट्रसंत नारायण गुरु यांचे स्मृतिदिन असून कॉम्रेड शरद पाटील व पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर यांची जयंती सुद्धा आहे. या निमित्ताने त्यांना अभिनंदन करायचे म्हणजे त्यांच्या विचारांना समाज जीवनात स्थापित करण्यासाठी आदर्श महापुरुषांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. कोकणस्थ महार को-ऑपरेटिव हाउसिंग सोसायटी, खार मुंबईतर्फे श्री चांगदेव नारायण मोहिते, श्री गणपत विठ्ठल कासारे आणि श्रीमती मुक्ताबाई दगडू सातांबेकर यांनी टुमदार घरी बांधली होती.

त्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बाबासाहेब म्हणाले होते की, तुम्ही सर्वांनी दूरदृष्टी आणि काटकसरीने वागून तुमचे हे वैभव भावी पिढीने टिकविले पाहिजे. जेणेकरून आपला संसार सुखाचा होऊ शकेल. आपल्या आदर्श महापुरुषांचे स्वप्न साकार व्हावे, असे अनेकांना वाटत असते. पण ते पूर्णत्वास नेण्यासाठी आपण नेमके काय करीत आहोत? याचे मात्र त्यांना भान नसते. करिता अपेक्षापूर्तीसाठी आपण त्याची किंमत मोजली पाहिजे. मात्र वर्तमान परिस्थितीत चळवळीकडे पाहत असताना आपण फार दुरावस्थेला पोहोचत चाललो आहोत. या स्थितीचे आकलन केले असता आपल्या आदर्श महापुरुषांनी आपल्यासाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत अर्थात आदर्शांनी जे कमविले, ते आपण गमावून बसत आहोत की काय? अशी विदारक स्थिती निर्माण झाल्यामुळे आपण वर्तमानात सदरील विषयावर चर्चा करीत आहोत.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, समाज जीवनात सुभेदाराच्या मुलाने झाडूवाला होणे हे संयुक्तिक ठरत नाही. अर्थात कुठल्याही अपत्याने त्याच्या मात्यापित्यापेक्षा मोठ्या पदावर पोहोचणे अपेक्षित आहे. डॉ. आंबेडकरांच्या कुठल्याही विधानाचा अर्थ समजून घेतला तर तो मार्मिक आणि भारदस्त आहे, असे जाणवते.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना उद्योजक वीरेंद्र गायकवाड महाले की, जनतेपर्यंत फुले शाहू आंबेडकरांचे विचार पोहोचविण्यासाठी फुले आंबेडकर स्टडी फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या प्रबोधनात्मक कार्यशाळेतून महत्वपूर्ण माहिती दिली जात आहे. बाबासाहेब छावणीमध्ये राहत असताना त्यांना भेटण्यासाठी जळगाव वरून एक अंध जोडपे आले होते. महत्त्प्रयासाने बाबासाहेब आंबेडकरांनी पी ई एस ची निर्मिती केली आहे. ज्यात आपण आपल्या मुलांना का शिकवत नाही? जे चळवळीला वेळ देतात, ते सर्व काही देत असतात. हिंदूंना गीता अर्धवट येते परंतु बायबल पूर्ण का येते? याचा पण विचार केला पाहिजे. अनेक समस्या आपल्यासमोर असल्या तरी उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कार्य केले पाहिजे.

आपल्या कार्याला सहकार्य करणाऱ्या आणि विरोध करणारी माणसे सुद्धा आपलीच असतात, याचे भान ठेवले पाहिजे. ज्या धर्मात आपली माणसे सांभाळले जात नाहीत, त्यांना इतर धर्माची माणसे स्थान देत असतात. याप्रसंगी अशोक मेश्राम म्हणाले की, आपल्यातील काही जणांनी स्वतःची घरे बनविल्यामुळे सदरील कार्यक्रमासाठी बाबासाहेबांना बोलवण्यात आले होते.

त्याप्रसंगी त्यांनी इतरांना सुद्धा सोबत घेण्याचा सल्ला दिला होता. उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, शासनकर्ती जमात बनून समाजाला एकसंघ ठेवण्यासाठी प्रयत्न करून पुढे गेले पाहिजे.

नीलकंठ जीवने म्हणाले की, कोण काय करतो? हे बघण्यापेक्षा आपण काय करतो? हे बघितले पाहिजे. सहकार्याच्या भावनेतून इतरांना लाभदायक ठरेल असे काम केले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, किमान आंबेडकर घराण्यातील नेतेमंडळी एकत्र नाहीत तर मग इतरांकडून काय अपेक्षा बाळगू शकतो? बँक ऑफ महाराष्ट्राचे सेवानिवृत्त व्यवस्थापक आर. पी. गायकवाड म्हणाले की, लोकांनी प्रतिसाद दिला नाही तरी आपण आपले कार्य सोडू नये. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, भीमा तुझ्या पाऊल खुणा, तुझी लेकरे पुसू लागलीत रें याची जाणीव करून देताना डेक्कन सोसायटी आणि पी ई एस सोसायटीची तुलना केल्यास फार तफावत पाहायला मिळते. उत्तुंग उंचीच्या महापुरुषांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक संस्थेला आज विद्यार्थी मिळेनासे झालेत, अशी दुरावस्था होत आहे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके व प्रास्ताविक प्रतीक पंचशील तर आभार अशोक मेश्राम यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, उद्योजक शशिकांत काळे, इंजि. किशोर पाटील, एन. डी. जीवने, प्रतीक पंचशील, अशोक मेश्राम, शेख आरिफ शेख समद, वीरेंद्र गायकवाड, उद्योजक मिलिंद बागुल, सेवानिवृत्त व्यवस्थापक आर. पी. गायकवाड, प्रा. शिवम गायकवाड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

शब्दांकन : बी. बी. मेश्राम,


संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : ८९८३०८२१२८ (Wh), ९४२१६७८६२८ (C) circumference1968@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ सप्टेंबर २०२५


## पावसाने या धुमाकूळ घातला..



पावसाने या
धुमाकूळ घातला
वळणा वळणावरती
त्याचा तांडव मातला...

पावसाची दया मया
आता मरुनिया गेली
वाड्या वस्त्या गावे त्याने
वाहूनिया नेली
बोलक्या जीवा सह
मुके जित्राबही मेली...

पावसाने या
धुमाकूळ घातला
वळणा वळणावरती
त्याचा तांडव मातला...

शेतातल्या पिकासह
त्याने मातीही नेली
गरिबांची घरे त्याने
मोडकी केली
घरासहित संसारही
पाण्याखाली बुडली
पावसाने या
धुमाकूळ घातला
वळणा वळणावरती
त्याचा तांडव मातला...


**लक्ष्मण वाल्डे**
कन्नड
जि.छत्रपती संभाजीनगर
मो.नं-8888606068



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' स्थापना दिन उत्साहात साजरा





**उमरगा (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दिनांक 24 सप्टेंबर 2025 रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या हस्ते ध्वजा रोहण करून हा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी NSS विद्यार्थी, NCC विद्यार्थी, प्राध्यापक, आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये 20 स्पर्धकानी सहभाग नोंदवला होता. यात पाटील सृष्टी प्रतिम हिने प्रथम क्रमांक पटकावला.माने प्रणिता नवनाथ हिने द्वितीय क्रमांक तर काळे वैष्णवी खंडू हिने तृतीय क्रमांक पटकाविला व कांबळे प्राची तानाजी हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. सर्व विजेत्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयातील विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ पदमाकर पिटले, कनिष्ठ महाविदयालयाचे उपपाचार्य प्रा. गुंडाजी बापू मोरे कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, कार्यक्रमाधीकारी डॉ भरत शेळके, डॉ अनिल देशमुख, डॉ रंजना चोचंडे, प्रा. चव्हाण पी. आर, प्रा. मुरली जाधव, प्रा ज्योती जोगदाबगे प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

यानंतर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त श्रमदान करून महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. श्रमदानामध्ये जवळपास 200 विदयार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भरत शेळके यांनी केले तर या दिनाचे महत्त्व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांनी सांगितले. बोलताना ते म्हणत होते की तरुणांच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा सिहांचा वाटा आहे.

अनेक विचारवंत, कलाकर या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुनच घडत असतात. तरी सर्व तरुणांनी याचा लाभ घ्यावा असे अव्हान त्यांनी उपस्थितांना केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ अनिल देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री अनिल तुंगे, विनायक जाधव, एनएसएस, एनसीसी विद्यार्थी आदींनी परिश्रम घेतले.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ सप्टेंबर २०२५

# जागतिक स्वप्न दिन : स्वप्नांतून साकार होणारे वास्तव

मानवजातीच्या इतिहासाचा वेध घेतला असता एक गोष्ट स्पष्ट दिसते की जग बदलण्याची, नव्याने घडवण्याची आणि मानवतेला नवी दिशा देण्याची प्रेरणा नेहमीच स्वप्नांतून जन्म घेत आलेली आहे. झोपेत पाहिलेली क्षणभंगुर चित्रे ही खरी स्वप्ने नाहीत, तर जेव्हा एखादी कल्पना, ध्येय किंवा आकांक्षा मनात दृढतेने आकार घेते आणि त्यासाठी व्यक्ती अथवा समाज कृतीशील होतो, तेव्हा त्याला खरे स्वप्न म्हणता येते. हाच संदेश संपूर्ण जगात पोहोचवण्यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी 'जागतिक स्वप्न दिन' साजरा केला जातो. हा दिवस लोकांना त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक स्वप्नांचा विचार करण्यास, त्यांना कृती आराखड्यात रूपांतरित करण्यास आणि जीवनाला तसेच समाजाला परिवर्तनाच्या मार्गावर नेण्यास प्रेरणा देतो.

'जागतिक स्वप्न दिन' ही संकल्पना प्रथम २०१२ साली अमेरिकन अभ्यासक ओझिओमा एग्वुओनव (Ozioma Egwuonwu) यांनी मांडली. त्यांना विश्वास होता की प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वप्न पाहण्याची क्षमता असते आणि ही स्वप्ने वैयक्तिक प्रगतीसोबतच सामाजिक, राष्ट्रीय व जागतिक प्रगतीसाठीही मार्गदर्शक ठरू शकतात. त्यांच्या पुढाकारातून २५ सप्टेंबर हा दिवस अधिकृतपणे 'जागतिक स्वप्न दिन' म्हणून साजरा होऊ लागला. सुरुवातीला शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि काही देशांत या दिवसाचे औचित्य साधून उपक्रम राबवले गेले, पण हळूहळू त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून स्वप्ने ही मानवी मनाची प्रेरणाशक्ती आहेत. जेव्हा एखादा युवक आपल्याला डॉक्टर, शास्त्रज्ञ, कलाकार किंवा नेता बनायचे आहे असे स्वप्न पाहतो, तेव्हा तेच स्वप्न त्याच्या अभ्यासाला दिशा देते, जीवनात अनुशासन आणते आणि त्याच्या वर्तनाला नवा अर्थ देते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता स्वप्ने ही सामूहिक चेतना घडविण्याचे कार्य करतात. समाजातील मोठ्या आंदोलनांचा आणि क्रांतींचा उगम सामूहिक स्वप्नांतूनच झालेला आहे. महात्मा गांधींनी लोकांच्या मनात स्वराज्याचे स्वप्न रुजवले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचे, न्यायाचे आणि बंधुत्वाचे स्वप्न मांडले, तर नेल्सन मंडेलांनी वर्णभेदमुक्त दक्षिण आफ्रिकेचे स्वप्न लोकांसमोर ठेवले. या सर्व स्वप्नांमधून जनसमूह प्रेरित झाले आणि सामाजिक-राजकीय क्रांती घडून आल्या आहेत.

भारतीय संस्कृतीत स्वप्नांना आध्यात्मिक व तात्त्विक स्थान आहे. संत साहित्यांत स्वप्नांचा उल्लेख अनेकदा येतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांनी मानवी मनाला अंतर्मुख होऊन आध्यात्मिकतेचे स्वप्न दाखवले. या स्वप्नांमुळे समाजात नैतिक मूल्यांची रुजवात झाली. आधुनिक काळात मात्र स्वप्ने राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेशी जोडली गेली. पं. नेहरूंनी आधुनिक भारताचे औद्योगिक व वैज्ञानिक स्वप्न पाहिले, तर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी तरुणाईला विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे भारताला 'विकसित राष्ट्र' बनविण्याचे स्वप्न दाखवले. डॉ. कलाम यांचे प्रसिद्ध वचन आहे, 'स्वप्न पहा, स्वप्न पहा, स्वप्न पहा. स्वप्ने विचारांमध्ये रूपांतरित होतात आणि विचार कृतीत रूपांतरित होतात.'('Dream, dream; dreams transform into thoughts and thoughts result in action.') हे वचन जागतिक स्वप्न दिनाचा खरा आत्मा स्पष्ट करते.

आजच्या काळात जागतिक पातळीवर असंख्य आव्हाने उभी ठाकली आहेत. गरीबी, भूक, बेरोजगारी, युद्ध, दहशतवाद, हवामान बदल, पाणीटंचाई, प्रदूषण, विषमता, महिलांवरील अत्याचार, बालमजुरी इत्यादी समस्यांनी मानवजातीचे अस्तित्वच धोक्यात आणले आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी केवळ राजकीय धोरणे किंवा आर्थिक योजना पुरेशा नाहीत, तर सामूहिक स्वप्ने आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न आवश्यक आहेत. उदा. संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेली शाश्वत विकास उद्दिष्टे ही प्रत्यक्षात मानवजातीची सामूहिक स्वप्ने आहेत. २०३० पर्यंत सर्व प्रकारची गरीबी नष्ट करणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे, लिंगभाव समानता प्रस्थापित करणे, हवामान बदलावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणाचा समतोल राखणे ही उद्दिष्टे म्हणजे मानवतेच्या भविष्यासाठीची स्वप्नेच आहेत. जागतिक स्वप्न दिन या स्वप्नांशी प्रत्येक व्यक्तीला जोडतो.

भारतीय संदर्भात तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद मानली जाते. भारतातील ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. या तरुणाईच्या स्वप्नांमध्ये भारताचे भविष्य दडलेले आहे. शिक्षण, रोजगार, स्टार्ट-अप्स, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, क्रीडा यांसारख्या क्षेत्रांत तरुणांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी झटले तर भारताला जगातील अग्रगण्य राष्ट्र बनविणे अशक्य नाही. मात्र या स्वप्नांना सामाजिक जबाबदारीची जोड देणे अत्यावश्यक आहे. कारण वैयक्तिक स्वप्ने फक्त वैयक्तिक प्रगती घडवतात, पण सामूहिक हिताशी जोडलेली स्वप्ने संपूर्ण समाजाचा कायापालट घडवतात.

शिक्षणक्षेत्रात जागतिक स्वप्न दिनाला विशेष महत्त्व आहे. शाळा-महाविद्यालयांत या दिवशी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील ध्येये ठरवण्यास प्रवृत्त केले जाते. अनेक ठिकाणी 'स्वप्न भिंत' (Dream Wall) तयार केली जाते, जिथे विद्यार्थी आपली स्वप्ने लिहून लावतात. ही केवळ कागदावरील नोंद नसून त्यांच्या जीवनयात्रेचा प्रारंभबिंदू ठरते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, त्यांची सर्जनशीलता वाढते आणि त्यांच्या स्वप्नांना वास्तवात आणण्याची ऊर्जा मिळते. जागतिक स्वप्न दिन आपल्याला अंतर्मुख होण्याची संधीही देतो. आपण आयुष्यात काय साध्य करू इच्छितो? आपली खरी ओढ कुठे आहे? आपले स्वप्न केवळ स्वतःपुरते आहे की त्याचा समाजालाही लाभ होईल? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. कारण समाजहिताशी जोडलेले स्वप्नच खरे परिवर्तन घडवते. महात्मा गांधींचे 'सर्वोदयी समाजाचे स्वप्न', डॉ. आंबेडकरांचे 'समानतेवर आधारित लोकशाहीचे स्वप्न', भगतसिंगांचे 'शोषणमुक्त समाजाचे स्वप्न', अब्दुल कलाम यांचे 'विकसित भारताचे स्वप्न' या सर्व स्वप्नांमधूनच भारताने दिशा घेतली आहे.

आज आपण पाहतो की जगभरातील अनेक आंदोलने, चळवळी आणि मोहिमा प्रत्यक्षात एखाद्या सामूहिक स्वप्नावर आधारलेल्याच आहेत. पर्यावरणवादी ग्रेटा थनबर्ग हिने तरुणांच्या मनात 'हवामान बदलाविरुद्ध कृती'चे स्वप्न जागवले. मलाला युसुफझाई हिने 'प्रत्येक मुलीला शिक्षणाचा अधिकार' या स्वप्नासाठी संघर्ष केला. नेल्सन मंडेला यांनी 'वर्णभेदमुक्त समाजाचे स्वप्न' सत्यात उतरवले. या सर्व उदाहरणांतून स्पष्ट होते की एखादे स्वप्न कितीही अशक्य वाटले तरी सातत्यपूर्ण प्रयत्न, जिद्द आणि एकजुटीने ते वास्तवात उतरविता येते. जागतिक स्वप्न दिनाचा खरा संदेश असा आहे की आपण आपल्या जीवनात ध्येय निश्चित करावे, मोठी स्वप्ने पाहावी, त्या स्वप्नांसाठी योजनाबद्ध प्रयत्न करावेत आणि त्यांना समाजहिताशी जोडावे. वैयक्तिक यशासोबत सामाजिक जबाबदारीची जाण ठेवणारे स्वप्न हेच भविष्यातील जगासाठी उपयुक्त ठरते. स्वप्न म्हणजे केवळ भास नाही, तर ते जीवनाला अर्थ देणारे वास्तव आहे.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, स्वप्ने नसतील तर कल्पनाशक्तीही मरते आणि कल्पनाशक्तीशिवाय प्रगती शक्य नाही. स्वप्न म्हणजे आशेचा दिवा, प्रगतीचा मार्गदर्शक आणि परिवर्तनाचे साधन. म्हणूनच दरवर्षी २५ सप्टेंबरला साजरा होणारा 'जागतिक स्वप्न दिन' हा केवळ एक औपचारिकता नाही, तर मानवतेच्या सामूहिक आशा-आकांक्षांचा उत्सव आहे. या दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकाने आपल्या स्वप्नांची उजळणी करावी, त्यांना नवी दिशा द्यावी आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी एकजुटीने पुढे यावे. कारण स्वप्नांतूनच वास्तव घडते आणि वास्तवातूनच नवी दुनिया साकार होते.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल —**
bagate.rajendra5@gmail.com